आज लक्ष्मी–कुबेर पूजन



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 85 ■ शुक्रवार, दि. 01 नोव्हेंबर 2024 ■ पाने 8 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# जिद्द अन् चिकाटीच्या बळावर उच्चपदाला गवसणी



स्नेह मात्र सवंगड्यासह गावाशी : मंत्रालयातील सहसचिवाची नोकरी सोडून आपल्या परिसराच्या विकासासाठी निवडणुकीच्या रिंगणात मेहकर. पैसा पद प्रतिष्ठा व मेट्रो सिटीत आलेशान जीवन जगत असतानाही केवळ गावाकडील भकास झालेली परिस्थिती सतत डोळ्यासमोर येत असल्याने मन स्वस्थ बसू देत नव्हते, आपलेही काही समाजासाठी देणे आहे, त्यामुळे आपण गावकडे जाऊन आपल्या परिसराचा विकास करावा, त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे, या उदात्त हेतुने मंत्रालयातील सहसचिवाची नोकरी सोडून सिद्धार्थ खरात यांनी आपल्या गावात, परिसरात येऊन विकासाचे ध्येय मनाशी बाळगून राजकीय मैदानात उडी घेतली आणि त्यांची सामाजिक तळमळ पाहूण एका सच्चा व प्रामाणिक व्यक्ती म्हणून ख्याती असलेल्या उबाठा शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना उमेदवारी देत विकासाची मशाल पेटविण्याची जबाबदारी दिली आहे. उच्चविद्याविभूषीत मंत्रालयीन सहसचिव पदाची नोकरी सोडून सिद्धार्थ खरात यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना च्यासहकार्याने मेहकर विधानसभा मतदार संघातून राजकीय उडी घेतली आहे. सिद्धार्थ खरात यांच्या राजकीय एंट्रीने मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. एक उच्चविद्याविभूषीत, सामाजिक कार्याची जाण असलेला उमेदवार म्हणून मतदारांकडून त्यांना प्रथम पसंती मिळत आहे. स्वेच्छानुववृत्त मंत्रालयीन सहसचिव पदावरून १ जुलैला स्वच्छानिवृत्ती घेत सिद्धार्थ खरात यांनी राजकारणात येण्याचा मार्ग निवडला. पश्चिम विदर्भात औद्योगिक विकास झालेला नाही, परिणामी या भागातील विकास खुंटलेला आहे, उच्च शिक्षण घेऊन्ही हाताला काम मिळत नसल्याने मायबापाच्या पोटचा गोळा हा केवळ कामाच्या शोधात छत्रपती संभाजीनगर, पुणे, चाकण, नागपूर, सिताबर्डी आदी औद्योगिक विकास झालेल्या शहरामध्ये जात आहे. घराच्या आणि आपल्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची केलेल्या मायबापाच्या तब्बल पाचशे ते हजार किलोमीटर दूर राहून आपली गुजरान करीत आहेत. पोरगं मोठं झाल्यानंतर आपपल्या आधार होईल, शिकून सवरून दोन पैसा कमावून आपल्या वाट्याला आलेले गरीबीचे जीन हे पुसून काढून म्हातारपणी तरी सुखाचे दिवस येतील, अशी आशा उराशी बाळगून मुलांना शिकवून सवरून मोठे केल्यानंतरही निराशाच आली आहे. अशी गंभीर परिस्थिती असताना मेहकर विधानसभा मतदार संघाच्या विकासासाठी कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही, ही बाब सतत मनाला बैचेन करत मुंबई येथे मंत्रालयीन सहसचिव पदावरील उच्चशिक्षीत सिद्धार्थ खरात यांना गावाकडे घेऊन आली. गावातील सवंगडी, ज्यांच्यासोबत खेळलो, बागडलो असे जिवलग मित्राच्या वाट्याला आलेले हे जीन आता त्यांच्या मुलाबाळांच्या वाट्याला येऊ नये, यासाठी या भागाचा सर्वांगिण विकास करायचाच असा दृढ निश्र्चत करीत सिदार्थ खरात यांनी मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात निवडणूक लढविण्याचा निर्णय घेत राजकीय मैदानात उडी घेतली. चळवळीतील कार्यकर्ता, सामाजिक कार्याची जाण, गावातील मायबाप जनतेच्या समस्यांची जाण असल्याने व मुळात सामाजिक कार्याचा, सहकार्य करण्याबरोबर गरिबाला मदत करण्याचा गुणधर्म अंगात असल्याने वेळोवेळी गरजुंना मदत करण्यासाठी आपुसक हात पुढे आले आहेत. मंत्रालयीन सहसचिव सिद्धार्थ खरात यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच ग्रामविकास, गृह विभाग या विभागांमध्ये सहसचिव म्हणून काम केले आहे. तसेच त्यांनी राज्यमंत्री कॅबिनेट मंत्री व केंद्रीय राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव म्हणूनही त्यांनी काम केले आहे. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे निकटवर्तीय तसेच युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्याशी घनिष्ठ मैत्रीचे संबंध असलेले उच्च विद्याविभूषित सिद्धार्थ खरात यांच्या नावाला मतदार संघातील सुशिक्षित वर्गासह ज्येष्ठ व युवा वर्गांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला असताना गत दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत निर्माण झालेल्या दुफळीनंतर या मतदार संघात वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराला ठेच पोहचविण्याचे काम करण्यात आले आहे. त्यामुळे या या मतदारसंघात शिवसेनेचीच मशाल पेटविण्यासाठी सिद्धार्थ खरात यांनी राजकीय मैदानात उडी घेतली असून त्यांच्या कामाचा दांडगा अनुभव भविष्यात मतदार संघातील कामे मार्गी लावण्यासाठी होईल, त्यांच्या काम करण्याच्या शैलीवर या मतदार संघात विकासाचे नंदनवन होईल, यात मात्र तिळमात्र शंका नाही.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## ग्रामदैवत बालाजी महाराजांचे दर्शन घेऊन विधानसभेच्या मैदानात

मेहकर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सिद्धार्थ खरात यांनी मेहकर नगरीचे ग्रामदैवत बालाजी महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेत विधानसभेच्या मैदानात एंट्री केली.

## मतदार संघातील प्रत्येक युवकाला रोजगार देण्याचा मानस

मेहकर लोणार मतदार संघात रोजगाराच्या सुविधा उपलब्ध नसल्याने सुशिक्षित बेरोजगारांची फौज वाढत चालली आहे. शेतीत उत्पन्नाची हमी नाही, शेतकरी व शेतकरी पुत्राच्या हाताला काम नाही, यामुळे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. येथील युवक हे इतर ठिकाणी रोजगाराच्या शोधात स्थलांतर करीत आहेत. हे मी गत काही महिन्यापासून पहात असल्याने मेहकर लोणार मतदार संघातील युवकांना रोजगार उपलब्ध करावा या उद्देशाने दि.१८ ऑक्टोबर रोजी भव्य रोजगार मेळावा आयोजित केला. या मेळाव्यात युवकांना नियुक्तीपत्र सुद्धा देण्यात आले असून मतदार संघातील युवकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्याला आपले प्रथम प्राधान्य राहील असा विश्र्वास उत्कर्ष प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा महायुतीचे उमदेवार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केला.

## सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम

उत्कर्ष फाऊंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कृषी, दुग्ध उत्पादक शेतकरी यांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. तर सेवा निवृत्त सहसचिव सिद्धार्थ खरात यांनी जानेफळ येथील सरस्वती कन्या विद्यालयाला सदिच्छा भेट दिली असता मुख्याध्यापिका मिनल जोहरे यांच्या संकल्पनेतून मोफत ब्युटी पार्लर कोर्स सुरू करून रोजगारची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्याध्यापिका जोहरे यांचे सिद्धार्थ खरात यांनी कौतुक केले.

## 'स्किल ऑन व्हील' या उपक्रमाद्वारे रोजगाराची संधी

उत्कर्ष फाउंडेशनच्या वतीने 'स्किल ऑन व्हील' या उपक्रमाच्या माध्यमातून जानेफळ येथील सरस्वती महाविद्यालय येथे आयोजन करून विद्यार्थ्यांना कौशल्य विकास शिक्षणाविषयी मार्गदर्शन करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

## तरुणांचा विकास हाच आमचा ध्यास

हिंदूहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी राजकारणापेक्षा समाजकारणावर जास्त भर द्या,अशी शिकवण दिली आहे. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीवर आजही शिवसेना व चालत आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनाही सर्व सामान्य गोरगरिबांची पाठीराखी शिवसेना म्हणून ओळखली जात आहे. बाळासाहेबांच्या याच तत्वावर उबाठाचे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे हे सुद्धा काम करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातच मेहकर लोणार मतदार संघातील दहावीपासून उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांना सहज रोजगार उपलब्ध व्हावा, हाच ध्यास असलेल्याचे मत महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले.

## बांधावरच नव्हे तर चक्क शेतकऱ्यांच्या सुडीवर

मेहकर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात हे एक उच्च विद्याविभूषित व्यक्तिमत्व आहे. त्यांनी मंत्रालय सचिव पदावरही काम केलेले आहे, त्यावेळेस गोरगरिबांचे कष्टाचे मोल त्यांनी जाणून गोरगरीब व सर्वसामान्यांना मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले आहे. त्यांनी हे उच्च पदाची नोकरी सोडून आता समाजसेवेत मन रमविले आहे. हे एरवी एसीमधून एकूण येणारे शब्द आता चक्क सिद्धार्थ खरात यांनी शेतातील बांधावरच नव्हे तर शेतकऱ्यांच्या सुडीवर जाऊन मळणी यंत्रामध्ये सोयाबीनचे काड टाकून शेतकऱ्यांच्या मेहनतीचे मोल समजून घेतले.

## जखमी युवकाच्या कुटुंबाला मदत

पोलिस भरतीचा सराव करीत असलेल्या युवकाला दुचाकीस्वार अचानक धडक दिल्याने पांगरखेड (तेली) येथील अत्यंत होतकरू मुलगा जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी सदर जखमी युवकाच्या निवासस्थानी भेट देऊन विचारपूस केली व धीर देत प्रतिकला सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले.

## दिंड्यांना पालख्यांना साहित्य वाटप

सुलतानपूर येथील प्रसिद्ध वेदांत आश्रम सिद्धपुर येथे प.पु ब्रह्मलीन सखाराम महाराज हिवरेकर यांच्या २६ व्या पुण्यतिथी निमित्त चिंतन सोहळा २० सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी मेहकर व लोणार तालुक्यातील वेगवेगळ्या गावातून पायदळ वारी दिंड्यांना सिद्धार्थ खरात यांनी विनायासह साहित्य वाटप केले.
















## दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा - शुभेच्छुक - मा. श्री. सिद्धार्थ खरात

## आयपीएलपेक्षाही विचित्र अवस्था

सगळ्यांच्या डोक्यात किडा वळवळतोय, तो म्हणजे निवडणुकीच्या उपाया प्रत्यक्ष निवडणुकीशी संबंध आहे, त्यांचे बरेच करे आहे. पण ज्यांचा संबंध नसतो. तेही निवडणूक अंगावर घेऊन चिंतन- मंथन करताना दिसत आहेत. इथपर्यंत ठीक आहे; मात्र यावेळची निवडणूक म्हणजे आयपीएलचा सामना आहे की काय, असे चित्र निर्माण झाले आहे. कोणत्या संघाचा खेळाडू, कोणत्या संघाकडून ऐनवेळी मैदानात उतरेल याचा नेम नाही. अशावेळी निष्ठा, प्रामाणिकपणा यांची दिलेली तिलांजली सर्वमान्य असते. आम्हाला आयपीएलच्या खेळाची व्यवस्था माहीत आहे. खेळाडूंचा लिलाव होतो, बोली लागते आणि त्यानुसार खेळाडूंची खरेदी केली जाते. मग ज्याच्यामध्ये क्षमता अधिक, त्याला मोठ्या किमतीला चांगल्या संघात स्थान मिळते. म्हणूनच तर आयपीएल म्हणजे एकाच संघातील अनेक खेळाडूंना एकमेकांच्या विरोधात लढविण्याची सोपी व्यवस्था असल्याचे बोलले जाते. नक्कीच तो खेळ आहे. जय-पराजय झाला तरी, त्यात सामाजिक नुकसान होत नाही. परंतु निवडणुकीच्या निमित्ताने रिंगणात उतरणाऱ्या उमेदवाराकडून सध्या खेळल्या जात असलेल्या आयपीएलमुळे उमेदवाराचे होत नसले, तरी सर्वसामान्य जनता आणि ज्या भागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडणूक लढविली जाते, त्या भागाचे नक्कीच नुकसान होते. आजपर्यंतच्या निवडणुकांमध्ये जेवढा सुळसुळाट झाला नव्हता, तेवढा यावेळी झाला. कारण आज इच्छुकांपुढे दोनच पर्याय शिल्लक राहिले. महाविकास आघाडी आणि महायुती. या दोन पर्यायांमध्ये सहा प्रमुख पक्षांच्या इच्छुकांना आपले भले करून घ्यावयाचे आहे. अशावेळी नाही मिळत उमेदवारी तर दुसऱ्या पक्षात उडी मारण्याचा पर्याय त्यांच्याकडे आहे. मात्र, या उमेदवारांनाही आपते प्राबल्य आणि निवडून येण्याची क्षमता सिद्ध करूनच प्रवेश घ्यावा लागतो, हे तेवढेच खरे! फरक एवढाच की, आयपीएलमध्ये जाहीर बोली लागते, येथे गुप्त बैठका आणि भेटीगाठीतून राजकीय पक्ष असलेल्या संघात स्थान मिळते. सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या रणधुमाळीत सर्वाधिक चर्चेत राहिलेला विषय म्हणजे पक्षबदल आणि पक्षप्रवेशः कुणी या पक्षातून तर कुणी त्या पक्षातून निवडणूक लढविण्यासाठी उड्या मारतो आहे. आज एका पक्षाच्या बड्या नेत्याला भेटलेली व्यक्ती उद्या दुसऱ्या पक्षाच्या नेत्याच्या गळ्यात गळे घालून त्याचे गुणगान गाताना दिसत असल्याने क्रिकेटच्या आयपीएलपेक्षाही विचित्र अवस्था निवडणुकीच्या आयपीएलची झाली आहे. निवडणूक लढविण्यास प्रत्येक पक्षात अनेक इच्छूक असतात. कित्येक वर्षांपासून पक्षासाठी काम करताना कधीतरी ही इच्छा जागृत होते. मात्र आयपीएलच्या खेळाडूंप्रमाणे अचानक येऊन एखादा नवा खेळाडू तिकिटाचा डाव साधून जातो आणि निष्ठावान आहे तिथेच राहतो. नवीन आलेल्याच्या पाठीमागे उभे राहून आगे बढो, हम तुम्हारे साथ है...' म्हणणारा हा स्वतः कधीच पुढे जात नाही, हे वास्तव आहे. कदाचित आयपीएलचा खेळ करणे ही राजकीय पक्षांची निवडणूक जिंकण्याची खेळी असू शकेल, पण मग अशावेळी इच्छूक असताना जिवाचे रान करून प्रयत्न करणाऱ्यांच्या इच्छांना खतपाणी घालण्याचे काम तरी केले जाऊ नये? आज जिल्ह्यातच नव्हे, तर सर्वत्रच या आयपीएलच्या खेळामुळे राजकीय वातावरण गलिच्छ झाल्याचे चित्र आहे. पक्षातील कार्यकर्ते तर नाराज आहेतच; सोबतच मतदारांचाही गोंधळ झालेला आहे. स्वार्थासाठी पक्षांची अदलाबदली करणाऱ्यांच्या पाठीशी राहायचे का? अशा मानसिकतेत मतदार आल्यास अशा खेळाडूंची चिंता नक्कीच वाढू शकते. आज निष्ठा, प्रामाणिकपणा या गोष्टी नगण्य असल्याचेच यातून स्पष्ट होते. पण या आयपीएलच्या खेळात मतदार संघाचे नुकसान होते, हे तेवढेच खरे अनेक खेळाडूंनी अनेक नव्या राजकीय संघांमध्ये सहभागी होत क्रिकेटच्या आयपीएलला मागे टाकले आहे. म्हणूनच तर समाजमाध्यमांवर आता अनेक प्रकारचे संदेश सामाजिक होत आहे. सकाळी प्रचाराला निघताना साहेब पक्षातच आहेत ना, याची खात्री करून घराबाहेर पडा...' अशा आशयाचा संदेश बरेच काही सांगून जाणारा आहे.

# दिवाळीतील ५ दिवसांचे महत्त्व

दीपावली हा संस्कृत शब्द आहे. ह्याचा अर्थ 'दिव्यांच्या ओळी'. भारतीय कॅलेंडर नुसार हा सण कार्तिक महिन्याच्या अमावस्येला साजरा केला जातो. हा सण ज्ञानाचा (प्रकाश) अज्ञानावर(अंधकार) विजय म्हणून प्रतित होतो.



पू म्हणजे पूर्णता, आणि जा म्हणजे पूर्णतेतून जन्माला आलेले. म्हणूनचं पूजा म्हणजे पूर्णतेतून जन्माला आलेली ती पूजा. आणि पूजा केल्याने परिपूर्णता व संतुष्टी प्राप्त होते. पूजा केल्याने वातावरणात सकारात्मकता वाढविणाऱ्या सूक्ष्म लहरी तयार होतात.

दिवाळी उत्सवाच्या पहिल्या दिवशी घर व कार्यालयीन परिसराला साफसफाई करुन सजविले जाते. धन व ऐश्र्वर्या ची प्रतीक असलेल्या देवी लक्ष्मीचे दारात रांगोळी व पारंपरिक चिन्हांनी सुशोभित करून स्वागत केले जाते. तिचे दीर्घ प्रतिक्षे नंतर चे आगमन दर्शविण्यासाठी घरात तांदळाचे पीठ व कुंकवाने छोटे छोटे पदचिन्ह काढल्या जातात. रात्रभर दिव्यांची आरास केल्या जाते. हा दिवस अतिशय शुभ मानला जात असल्याने, ह्या दिवशी गृहिणी सोनं वा चांदीची भांडी खरेदी करतात. भारतात कुठे कुठे पशु धनाची ही पूजा केली जाते. हा दिवस धन्वंतरी (आयुर्वेदाची देवता अथवा देवांचे वैद्य) चा जन्मदिन म्हणून ही साजरा केला जातो. ह्या दिवशी मृत्यू देवता यमाचे पूजन करण्यासाठी रात्रभर दिवे जाळले जातात. म्हणूनचं ह्याला यमदीपदान असे सुद्धा जाणले जाते. आकस्मिक मृत्यू चे भय दूर करण्यासाठी हे पूजन केले जाते.

दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. भगवान बुद्धाने म्हटले आहे, आपो दीपो भवः, म्हणजे तुम्ही स्वतःचं प्रकाश रूप व्हा. सगळे वेद व उपनिषद हेच सांगतात, की तुम्ही सारेच प्रकाशमान आहात. तुमच्यापैकी कोणी प्रकाशित झाला आहात तर कोणी अद्याप व्हायचे आहेत. पण सर्वांमध्ये प्रकाश देण्याची क्षमता आहे. दिवाळीच्या दिवशी आपण सारे अंधकाराला दूर सारतो. अंधकार मिटविण्यासाठी केवळ एक तिरीप पुरेशी नाही. त्यासाठी पूर्ण समाजाला प्रकाशित व्हावे लागेल. परिवारातील केवळ एक सदस्य प्रसन्न असेल तेवढे पुरेसे नाही, प्रत्येक सदस्याला प्रसन्नचित्त व्हावे लागेल. जर एकसुद्धा नाराज राहिला, तर बाकी सगळे प्रसन्न राहू शकत नाही. म्हणून प्रत्येक घराला प्रकाशमान व्हावे लागेल. दुसरी गोष्ट आपल्या सर्वांच्या आयुष्यात आचरावी लागेल ते म्हणजे माधुर्य. इतरांना केवळ मिठाई वाटू नका, तर सगळ्यांना तो गोडवा वाटा. दिवाळीचा सण आम्हाला हेच सांगतो की जर कुणाबद्दल मनात काही अढी, ताण असेल तर फटाक्यासारखे त्याला उडवून लावा आणि आयुष्याची परत नव्याने सुरुवात करून, उत्सव साजरा करा.

### नरक चतुर्दशी

दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजे नरक चतुर्दशी. ह्या दिवशी भल्या पहाटे उठून, सूर्योदया अगोदरच स्नानादी कार्ये आटोपून तयार होण्याची परंपरा आहे. ह्या सणाची एक पुरातन कथा आहे. असुरांचा राजा नरकासुर प्रागज्योतीसपूर( नेपाळचा दक्षिण प्रांत) येथे राज्य करीत होता. एका युद्धात इंद्रावर विजय प्राप्त केल्यावर, देवांची माता अदिती हिची सुंदर कर्णकुंडल त्याने हिसकावून घेतली व देव आणि संतांच्या सोळा हजार कन्यांना आपल्या अंतःपुरात कैदेत ठेवले.

नरक चतुर्दशी च्या दिवशी भगवान श्रीकृष्णा ने ह्या दानवाचा वध करून, त्या सर्व कन्यांची मुक्तता केली व अदितीची मौल्यवान कर्णकुंडलं परत प्राप्त केलीत. त्या महिलांनी सुगंधी तेलाने मर्दन करून आणि स्नान करून स्वतःला शुचिर्भूत करून घेतले. म्हणून प्रातःस्नानाची ही परंपरा वाईट प्रवृत्ती वर दिव्यतेच्या विजयाचे प्रतीक आहे. ह्या दिवशी शुभ संकल्प घेण्याची रीत आहे.

### लक्ष्मी पूजन

दिवाळीचा तिसरा दिवस, सर्वात महत्वाचा, लक्ष्मी पूजन. ह्या दिवशी सूर्य आपल्या दुसऱ्या चरणात प्रवेश करतो. अमावस्या असूनही ह्या दिवसाला अतिशय शुभ मानल्या जाते.

छोट्या छोट्या दिव्यांनी सारे शहर उजळून टाकले जाते आणि रात्रीचा गहिरा काळोख हळूहळू दूर सारल्या जातो. लक्ष्मी देवी ह्या दिवशी पृथ्वीतलावर भ्रमण करून भरभराट व समृद्धी च्या आशिर्वादाची लूट करते असे मानल्या जाते. सायंकाळी लक्ष्मी पूजन केल्या जाते आणि घरी बनविलेल्या मिठाई चे सर्वांना वितरण केले जाते.

हा अतिशय शुभ दिन मानल्या जातो, कारण ह्या दिवशी बऱ्याच संतांनी व महात्म्यांनी समाधी घेऊन आपल्या नश्र्वर देहाचा त्याग केला होता. ह्या महान संतांमध्ये भगवान श्रीकृष्ण व भगवान महावीरांचा समावेश आहे. ह्याच दिवशी प्रभू रामचंद्र, सीतामाई व लक्ष्मणा सोबत, १४ वर्षांचा वनवास सोसून अयोध्येत घरी परतले होते.

दिवाळीच्या ह्या दिवसाबद्दल एका रोचक कथेचा कटोपनिषद मध्ये उल्लेख आहे. नचिकेत नावाचा एक छोटा मुलगा होता. त्याला असे वाटायचे की मृत्यू देवता यम हे रूपाने अमावस्येच्या काळरात्री सारखे भयाण असावेत. पण तो प्रत्यक्ष जेव्हा त्यांना भेटला तेव्हा त्यांचा शांत चेहरा व सामान्य रूप बघून आश्र्चर्यचकित झाला. यमाने नचिकेताला समजावून सांगितले की केवळ मृत्यू ची काळोखी गुहा पार केल्या नंतरच मनुष्य श्रेष्ठ ज्ञानाचा प्रकाश बघू शकतो.आणि त्याचा आत्मा परमात्म्यासोबत एकरूप होण्यासाठी देहाचा त्याग करतो. तेव्हाच नचिकेताला सांसारिक आयुष्य आणि मृत्यूच्या महत्वाची जाणीव झाली व तो आपल्या साऱ्या शंकां दूर सारून दिवाळीच्या उत्सवात सहभागी झाला.

अमावस्येच्या रात्री दिवाळी साजरी करतात आणि त्या दिवशी देवी लक्ष्मी ची पूजा करतात. आम्हाला समृध्द करणारी दिव्यता, ही देवी लक्ष्मीचेच रूप आहे. भारतात ईश्र्वराला केवळ पुरुष रूपातच नव्हे तर स्त्री रुपात सुध्दा पुजले जाते. ज्या प्रमाणे पांढऱ्या प्रकाशात सप्तरंग अंतर्भूत असतात, त्याप्रमाणे दिव्यतेची वेगवेगळी रूपे असतात. म्हणून आजच्या दिवशी आपण ऋग्वेदातील काही प्राचीन मंत्रांद्वारे देवी लक्ष्मी ची आराधना करू या आणि त्या द्वारे सकारात्मक लहरी व समृद्धी प्राप्त करू या.

दिवाळीचा पहिला दिवस म्हणजे धनत्रयोदशी. प्राचीन काळी लोकं ह्या दिवशी आपले सारे धन देवासमोर आणून ठेवीत. सामान्यतः आपले धन बँकेत किंवा लॉकर मध्ये सुरक्षित ठेवल्या जाते. पण प्राचीन काळी लोकं आपले सारे धन समोर पसरवून ठेवत आणि समृद्धी चा आनंद घेत होते. केवळ सोनं, चांदी हेच धन नव्हे तर आपले ज्ञान हे सुद्धा एक धनच आहे. तर ह्या प्रकारे उत्सव साजरा केला जात असे. तुम्हाला आपल्या ज्ञानाचे नीट जतन करायला हवे व त्याबद्दल समृद्धीची भावना हवी. धनत्रयोदशी हा आयुर्वेदाचा दिवस आहे, कारण आपली जडी बुटी व त्या वनस्पती सुद्धा एक प्रकार चे धन आहे. असे म्हणतात की ह्याच दिवशी मानवतेला अमृताची देण मिळाली होती.

तर आजच्या दिवशी तुम्ही खूप सौभाग्यशाली आहात असे मानावे आणि तृप्तीचा अनुभव घ्यावा. जेव्हा जेव्हा आपण स्वतःला खूप भाग्यशाली समजतो तेव्हा आयुष्यात बरेच काही प्राप्त होते. बायबल मध्ये लिहिले आहे की ज्यांच्या जवळ आहे त्यांना अजून दिल्या जाईल आणि ज्यांच्याकडे काही नाही त्यांच्या कडून



जे काही थोडं फार आहे तेही हिसकावून घेतल्या जाईल. प्राचीन काळापासून हीच शिकवण आहे की मनात सतत समृद्धी चा भाव जागता ठेवावा. समृद्धी आपल्या आतून सुरु होते व मग ती बाहेर अभिव्यक्त होते. तुम्हाला खूप आशीर्वादाचे पाठबळ आहे, ह्याच भावनेने आज परत जावे.

### गोवर्धन पूजा (बलि प्रतिपदा)

दिवाळीचा चौथा दिवस हा वर्ष प्रतिपदा म्हणून जाणला जातो. ह्या दिवशी राजा विक्रम सिंहासनावर आरूढ झाला होता. ह्याच दिवशी श्रीकृष्णाने इंद्र देवाच्या कोपाने झालेल्या अतिवृष्टी पासून गोकुळातल्या प्रजेचे संरक्षण करण्यासाठी गोवर्धन पर्वत उचलला होता.

### भाऊबीज

भाऊ व बहिणीतील अतूट प्रेमाचे प्रतीक म्हणून भाऊबीज साजरी केली जाते. भाऊ आपल्या बहिणींना त्यांच्या प्रेमाखातर सुंदरशी भेटवस्तू देतात.

### फटाके व आतिषबाजी

क्रोध, मत्सर असो वा भय, ह्या सर्व नकारात्मक भावना आपल्या मनात गेल्या वर्षभरात जमा झाल्या असतील त्यांचा, फटाक्यांच्या रुपात स्फोट व्हायला हवा. तूमच्या मनात जर कुणाबद्द्दल काही नकारात्मक भाव असेल तर तो फटाक्या सोबत फोडून नष्ट करा, किंवा ज्या व्यक्तीबद्दल द्वेष असेल त्याचे नाव त्या फटाक्या वर लिहून फोडा व त्या सोबतच तो द्वेष नष्ट झाला असे समजा. पण आपण काय करतो? तो नकारात्मक भाव नष्ट करण्याऐवजी, त्या व्यक्तीलाच नष्ट करायला बघतो अथवा स्वतःला त्या भावनांच्या आगीत होरपळून घेतो.

नकारात्मक वाईट भावना फटाक्यांच्या स्फोटात नष्ट करा व त्या व्यक्तीसोबत नव्याने मैत्रीचा हात समोर करा. मग बघा, तुम्हाला आतून कसं हलकं फुलकं वाटेल व आनंद, प्रेम शांतीची अनुभूती लाभेल. त्या नंतर, त्या व्यक्ती सोबत तोंड गोड करा व दिवाळी साजरी करा. ती व्यक्ती नव्हे, त्याच्या अवगुणांचा फटाक्यां सोबत नाश करणे, हीच खरी दिवाळी होय. ह्या उत्सवाची सुरुवात कृष्ण पक्षाच्या त्रयोदशी पासून होते.

अशी मान्यता आहे की धनाची देवता श्री लक्ष्मी ही अतिशय चंचल असून, जिथे खूप मेहनत, प्रामाणिकता व कृत्यज्ञतेचा भाव आहे, तिथेच तिचा वास असतो. श्री मद भागवतात असा उल्लेख आहे की, लक्ष्मी मातेने बळी राजाच्या शरीराचा त्याग केला व ती इंद्र देवासोबत जाऊ इच्छित होती. कारण विचारले असता तिने सांगितले की, जिथे सत्य, दान, तप, पराक्रम आणि धर्माचे संवर्धन होते, तिथेच तिचा वास असतो.

दिवाळीत आपण सारे प्रार्थना करू या व आभार व्यक्त करू या. ह्या पृथ्वी तलावरच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात समृद्धीचा दरवळ असो व सर्व लोकांना प्रेम, आनंद व विपुलता लाभो...









DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित







दिपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा ! शुभेच्छुक आपला विदर्भ परिवार






# उच्च शिक्षीत नेतृत्व : डॉ. सौ. ऋतुजाताई चव्हाण

# सामाजिक कार्याने जिंकली मने

## सकारात्मक कार्याला ऋषांक चव्हाणची साथ



उच्च शिक्षीत महिला, सामाजिक कार्याची भान असलेल्या डोणगाव ता. मेहकर जि. बुलढाणा येथील डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी एमबीबीएस असे वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. या शिक्षणाबरोबरच त्यांनी राजमाता जिजाऊ सामाजिक फाऊंडेशनच्या माध्यमातून मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात आपल्या सामाजिक कार्याला प्रारंभ केला. अवघ्या पंचवीशीत त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवून गोरगरिब व सामान्य जनतेचे मन जिंकले. त्यांना पती ऋषांक चव्हाण व प्राध्यापक व शिक्षणांची गोडी असलेल्या वडील संजय संतोषराव गवई यांचेही मोठे योगदान मिळाले. सामाजिक, राजकीय, सहकार या क्षेत्राबरोबरच शेती व्यवसायात आपले अमुल्य योगदान देणार्या डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी या सामाजिक कार्याला राजकीय बळ मिळावे, यासाठी विधानसभा मतदार संघात पाऊल टाकले, त्यांच्या राजकीय, सामाजिक, सहकार यासह सर्वच क्षेत्रातील योगदान लक्षात घेता त्यांना वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारीही बहाल करण्यात आली. विधानसभा निवडणुकीत वैद्यकीय क्षेत्रातील एक उच्चशिक्षीत, गोरगरिबांच्या संकटकाळी धावून येणारे, सामाजिक कार्याची,शेतकरी मस्यांची जाण असणारे नेतृत्व म्हणून डॉ. सौ ऋतुजा ऋषांक गवई यांना ओळखले जात असून विधानसभा निवडणुकीत डॉ. ऋतुजा गवई यांच्या रुपाने मतदारांसमोर एक नवा पर्याय निर्माण झाला आहे. मतदारसंघातील नागरिकांमध्ये असलेला दांडगा जनसंपर्क, स्वच्छ प्रतिमा, महिला सबलीकरणात भरीव कामगीरी, शेतकरी प्रश्नांवर विविध मोर्चे, आंदोलन व बैठकांमध्ये सक्रीय सहभाग, गोर-गरीबांच्या मोफत रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर मतदार संघातील प्रत्येक शहर, ग्रामीण भाग व गांव-वस्त्यांवर वैयक्तीक संपर्क वेळप्रसंगी गोरगरिबांना आर्थिक मदत,तसेच विविध धार्मिक सण, उत्सव, मोहरम, जयंती, पुण्यतिथी प्रसंगी भरीव आर्थिक योगदान देणारे नाव म्हणूनही त्यांची मतदार संघात ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणीसाठी मदत, वडिलांचा मागासवर्गीयांमध्ये दांडगा जनसंपर्क व नातेवाईकांचा मतदार संघामध्ये मोठा गोतावळा. पतीचे सहकार क्षेत्रात असलेले भरीव योगदान व मतदार संघातील प्रभाव. पतीचे सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य व मतदार संघात दांडगा जनसंपर्क व मोठा मित्र परिवार.अनेक गरीब व अनाथ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेतलेले आहे. परिसरातील खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी सामन्यांचे आयोजन, खेळाडुंना किट वाटप व बक्षीस वितरण केलेले आहे. शेतकर्यांच्या विविध प्रश्नांवर भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन,परिसरातील अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप,पतीने सहकार क्षेत्राच्या माध्यमातुन मतदार संघातील अनेक गरीब व होतकरु तरुणांना उपलब्ध करून दिलेला रोजगार अशा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय, महिलासाठी व्यवसाय उभा करण्यासाठी घेतलेला पुढाकार अशा अनेक क्षेत्रांतील भरीव योगदानामुळे व सर्व समाजातील एक आपलेसे नेतृत्व म्हणून डॉ.सौ.ऋतुजा ऋषांक (गवई) यांच्याकडे पाहिले जात आहे.त्याचबरोबर एक ऋषांक चव्हाण व डॉ. ऋतुजा चव्हाण यांची एक आदर्श दाम्पत्य म्हणूनही ओळख असून त्यांना आदर्श दाम्पत्य पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे.महापुरुषांचे विचार अंगिकारुन करून सहजीवनाची वाटचाल करणार्या व आंतरजातीय विवाह करुन करून समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण करर्याबरोबरच सहकार व वैद्यकीय क्षेत्रात अनमोल योगदान देणार्या डोणगाव अर्बनचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण आणि डॉ. ऋतुजाताई चव्हाण-गवई या दाम्पत्यांचा आदर्श दाम्पत्य म्हणून दि.२२ सप्टेंबर रोजी मेहकरमधील हॉटेल के.व्ही. प्राईड येथे सेवा संकल्प प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ.नंदकुमार पालवे, डॉ. आरती पालवे, ड. पुरुषोत्तम खेडेकर, श्रीराम मल्टिहॉस्पीटलचे संचालक डॉ. हेमराज लाहोटी, उद्योजक अविनाश वतारी यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात आले आहे. समाजसुधारकांच्या स्वप्नातील समाजाच्या बांधणीसाठी या दाम्पत्यांनी पाऊल टाकत आपल्या कर्तृत्वाच्या बळावर सहकार व वैद्यकीय क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. डोणगाव अर्बन पतसंस्थेतील व्यवस्थापकासह सर्व कर्मचार्यांना आपलेसे करणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख आहे. आपल्या ताटातील अन्न हे सगळेच आपले नव्हे, तर त्यातील काही घास इतरांनाही द्यावेत, ही भावना कायम ऋषांक चव्हाण यांच्यामध्ये असल्याचे वेळोवेळी त्यांच्या सामाजिक कार्यावरून दिसून आले आहे. या आदर्श कार्याच्या बळावर या आदर्श दाम्पत्याने राजकारणात पाऊल टाकले आहे. महापुरुषांचे विचार अंगिकारुन करून सहजीवनाची वाटचाल करणार्या ऋषांक चव्हाण व डॉ. ऋतुजा चव्हाण यांनी सहकार व वैद्यकीय क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. या निस्वार्थ सामाजिक कार्याने त्यांचा मोठा चाहता वर्ग मेहकर मतदार संघात निर्माण झाला आहे. उच्चविद्याविभूषीत व सामाजिक कार्याची जाण असणार्या या आदर्श दाम्पत्याचे राजकारणाकडे वळलेले पाऊल हे नक्कीच मेहकर मतदार संघाचा चेहरामोहरा बदलणारा ठरेल. असा आशावाद सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त करीत त्यांच्याकडे तरुणतडफदार व सामाजिक कार्याची जाण असणारे व्यक्तीमत्व म्हणून पाहिले जात आहे. डॉ. ऋतुजा चव्हाण यांच्या उमेदवारीचा इतर राजकीय पक्षातील उमेदवारांनीही धसका घेतला असल्याचे बोलले जात आहे.

### निरोगी समाजासाठी ऋषांक चव्हाण यांनी उभारली भव्य व्यायाम शाळा

आरोग्य हीच खरी संपत्ती आणि आरोग्याची झालेली हानी ही पैशाने कधीच भरून निघत नाही, त्यामुळे मानव समाज हा निरोगी राहावा, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून डोणगाव अर्बनचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण यांनी पुरुष व महिलांच्या हितासाठी भव्य अशी व्यायामशाळा उभारली आहे. ऋषांक चव्हाण हे सामाजिक कार्यातही अग्रेसर असतात आणि समाजाचे आपलेही काही देणे आहे ही भावना ठेऊन त्यांची नेहमीच सहकार्याची भूमिका असते. त्यांची अर्धांगिनी राजमाता फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण ह्यांनी आरोग्याचे महत्त्व जाणून सर्वांना आरोग्याचे महत्व पटवून दिले आहे. या उच्चविद्याविभूषीत दाम्पत्यांच्या संकल्पनेतून मेहकर ते मालेगाव रोडवर स्थित डोणगाव अर्बनची नवीन भव्य इमारतीमध्ये महिला व पुरुषांसाठी व्यायामशाळा उभी केली आहे.तर या व्यायामशाळेचे स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रसिद्ध बॉडिबिल्डर, महाराष्ट्र पोलिस किशोर डांगे यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात उद्घाटन करण्यात आले आहे. आपण भटक्या विमुक्त पूर्वजांपासून उत्क्रांत झालो आहोत ज्यांनी आपला सर्व वेळ अन्न आणि निवारा शोधण्यात, दररोज मोठ्या अंतरावर प्रवास करण्यात घालवला. आपले शरीर नियमितपणे सक्रिय राहण्यासाठी डिझाइन केलेले आहे आणि विकसित झाले आहे.

### शेतकरी नेते तुपकरांच्या नेतृत्वात राजकारणात पाऊल



शेतकरी नेते तुपकरांच्या नेतृत्वात राजकारणात पाऊल टाकलेल्या डॉ. ऋतुजा चव्हाण यांना आता रविकांत तुपकर यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे मेहकर विधानसभा मतदार संघात आता चांगलीच रंगत वाढत आहे. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आम्ही सामाजिक कार्याची जान असणार्या तसेच शेतकर्यांच्या समस्यांना वाचा फोडणार्या उमदेवारांना क्रांतीकारी शेतकरी संघटनेचा पाठिंबा देणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार मेहकर मतदार संघातील वंचितच्या उमदेवार ह्या सामाजिक कार्यात सदा अग्रेसर राहत आल्या आहेत. तसेच त्यांना शेतकर्यांच्या समस्यांची जान आहे, स्वच्छ प्रतिमा व शेतकरी हितासाठी तळमळ असलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ.सौ.ऋतुजा ऋषांक चव्हाण यांना बिनशर्त पाठिंबा दिला आहे. त्यामुळे मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातून डॉ. ऋतुजा चव्हाण यांची बाजु भक्कम झाली आहे.

# स्नेह आणि आपुलकीच्या नात्याला दोस्तीचे बंधन

## मित्रासाठी पद आणि प्रतिष्ठेचा त्याग : ज्ञानेश्वर बनला मित्राच्या गळ्यातील ताईत



पद... पैसा...आणि प्रतिष्ठेसाठी एकीकडे सख्खे भाऊ एकमेका विरोधात जाण्यास मागेपुढे पहात नसल्याचे चित्र राजकारणात आहे. तर दुसरीकडे फक्त प्रेम आणि स्नेहाचे बंधन असलेल्या मैत्रीतील हे अतूट नाते टिकवण्यासाठी सच्चा मित्र आपल्या पद आणि प्रतिष्ठेचा त्याग करून श्रीकृष्ण सुदामाची मैत्री आजही कायम आहे आणि विशेष करून ती सध्याच्या राजकारणातही अबाधित असल्याचे शेतकरी नेते ज्ञानेश्वर टाले व ऋषांक चव्हाण यांच्या या अनोख्या मैत्रीतून सिद्ध झाले आहे.

मैत्री ही श्रीमंतीच्या बळावर व ठरवूनही करता येत नाही, आणि स्वार्थासाठी केलेली मैत्री ही टिकतही नाही हे तेवढेच सत्य आहे. मैत्री फक्त विचारातून आणि निस्वार्थ भावनेतून होते.त्यामुळे मैत्री एक हवंहवंसं वाटणारं आपुलकीचं नातं आहे. त्यामुळे या नात्याला कोणताही स्वार्थ आतापर्यंत तोडू शकले नाही. असंच मैत्री नातं हे येथील शेतकरी नेते ज्ञानेश्वर टाले व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा चव्हाण यांचे पती ऋषांक चव्हाण यांच्यातील आहे. शेतकरी नेते ज्ञानेश्वर टाले यांनी. कोणत्याही आमिषाला बळी न पडता केवळ मैत्रीसाठी कुणासोबतही न जाण्याचा निर्णय घेत आपल्या मित्राला आपली साथ मिळावी, या निस्वार्थ भावनेतून ऋषांक चव्हाण यांच्यासोबत जाऊन आपले एक मैत्रीचे नाते जपत आजही या स्वार्थी दुनियेत मैत्री मात्र कायम असल्याचे दाखवून दिले आहे. ऋषांक चव्हाण यांची शेतकरी नेते ज्ञानेश्वर टाले यांच्याशी अनेक वर्षांपासून मैत्रीची नाळ जुळलेली आहे. ही नाळ फेविकॉलसारखी अत्यंत घट्ट असून, कधीही या मैत्रीमध्ये दुरावा आला नाही. म्हणूनच अनेकजण त्यांना फेविकॉलचा जोड म्हणून ही मस्करी करतात. शेतकरी नेते ज्ञानेश्वर टाले हे सामाजिक कामात अग्रेसर आहेत. एक हळव्या मनाच स्वोजळ व्यक्तिमत्त्व असल्याने अनेकांशी स्नेह जुळलेला आहे. आजकाल मैत्रीत क्षुल्लक कारणावरुन दुरावा आल्याच्या अनेक घटना पाहायला मिळतात. परंतु, ज्ञानेश्वर टाले डायरीत याला कोठेही थारा नाही म्हणूनच तो मित्राच्या गळ्यातील ताईत बनलाय. आमचा हा शेतकरी नेता ज्ञानेश्वर टाले दोस्ती दुनियाचा राजा माणूस म्हणून संबोधल्या जातो...



देविदास खनपटे
मुख्य संपादक